# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द)



# NEWSLETTER

## OCTOBER -DECEMBER 2022

## दि.२९ सप्टेंबर २०२२ ते दि. १ ऑक्टोबर २०२२

### १) प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेल अंतर्गत कार्यशाळा

शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन, अवसरी महाविद्यालयाचे प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेल अंतर्गत इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशनच्या सहकार्याने २९ सप्टेंबर २०२२ ते १ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत इंडवेल ऑटोमेशन, मंगळुरू, कर्नाटक द्वारे आयोजित पीएलसी प्रोग्रामिंगवर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



## दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते ०२ ऑक्टोबर, २०२२

### २) राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत "इंडीयन स्वच्छता लिग" उपक्रम


इंडीयन स्वच्छता लिग हा उपक्रम शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे दि.१७ सप्टेंबर, २०२२ ते दि. ०२ ऑक्टोबर, २०२२ या पंधरवडयात "स्वच्छ अमृत महोत्सव" कार्यक्रम अंतर्गत विविध उपक्रम घेऊन राबविण्यात आला. या उपक्रमाची सांगता २ ऑक्टोबर, २०२२ रोजी म. गांधी जयंतीला सकाळी ०८ वाजता मा. प्राचार्य कक्षात म. गांधीजीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. परंतु त्यानंतरही दि. १२ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत इंडीयन स्वच्छता लिग या उपक्रमांतर्गत महाविदयालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांच्या माध्यमातून महाविद्यालयाचा आजूबाजूचा परीसर साफसफाई करून स्वच्छ करण्यात आला. यात खुरटे गवत, कागद, प्लास्टीक कचरा जमा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली.






इंडीयन स्वच्छता लिग अंतर्गत स्वच्छ अमृत महोत्सव हा उपक्रम महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. डी. आर. पानगव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. एम. डी. पांचाळ यांच्या उपस्थितीत पार पडला. सदर उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० विद्यार्थी स्वयंसेवक, महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, सर्व विभागाचे विभागप्रमुख, सर्व अध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. सदर उपक्रमाचे नेतृत्व व समन्वयन राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी/समन्वयक प्रशांत ढोले व चारुशीला पानवळ यांनी केले.


GPS Map Camera
Shindemala, Maharashtra, India
XXP7+9FX, Shindemala, Maharashtra 412405, India
Lat 18.985955°
Long 73.963659°
02/10/22 08:14 AM GMT +05:30


GPS Map Camera
Awasari Khurd, Maharashtra, India
XXP7+FMJ GOVERNMENT BOYS HOSTEL STAFF QUARTERS, Awasari Khurd, Maharashtra 410503, India
Lat 18.986604°
Long 73.963605°
02/10/22 08:05 AM GMT +05:30


Shindemala, Maharashtra, India
XXP7+9FX, Shindemala, Maharashtra 412405, India
Lat 18.985983°
Long 73.963534°
02/10/22 08:13 AM GMT +05:30


GPS Map Camera
Awasari Khurd, Maharashtra, India
XXP7+FMJ GOVERNMENT BOYS HOSTEL STAFF QUARTERS, Awasari Khurd, Maharashtra 410503, India
Lat 18.98656°
Long 73.963589°
02/10/22 08:06 AM GMT +05:30


GPS Map Camera
Awasari Khurd, Maharashtra, India
XXP7+FMJ GOVERNMENT BOYS HOSTEL STAFF QUARTERS, Awasari Khurd, Maharashtra 410503, India
Lat 18.986695°
Long 73.963794°
02/10/22 08:04 AM GMT +05:30

## दि.०७ ऑक्टोबर २०२२

### ३) संगणक विभागात COMPSA अंतर्गत सायबर जागरुकता दिवस चे आयोजन

संगणक विभागामध्ये, ०७ ऑक्टोबर २०२२ रोजी "सायबर जागरूकता दिवस" या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना सायबर सेक्युरिटी या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यात डॉ . घुंबरे व डॉ. थोरात यांनी मार्गदर्शन केले.






## दि. १२ ऑक्टोबर २०२२

### ४) स्वयंचल अभियांत्रिकी विभागात विद्यार्थी संघटनेचे (AESA) उद्घाटन

दि. १२ ऑक्टोबर २०२२ रोजी स्वयंचल अभियांत्रिकी विभागात विद्यार्थी संघटनेचे उद्घाटन महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. डी. आर. पानगव्हाणे, विभागप्रमुख, डॉ .एम. जे. पाबळे आणि AESA समन्वयक श्रीमती प्रा. भा. पिंपळकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला विभागातील सर्व प्राध्यापकांसह जवळपास १२० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली.




त्यानंतर AESA च्या सर्व निवडून आलेल्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

सर्व प्रथम शुभांगी शिंदे (LR) हिने महिला सक्षमीकरण आणि ऑटोमोबाईल क्षेत्रातील महिलांसाठी विविध उपक्रम याविषयावर आपले मत मांडले. मुलींनी स्वतःचा विकास करण्यासाठी आगामी उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची विनंती केली. त्यानंतर AESA President अक्षय घुगरकर यांनी आपल्याला संधी दिल्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली व पुढील कार्यक्रमांबद्दल सांगितले ज्या मध्ये रस्ता सुरक्षासप्ताह, तांत्रिक मासिक आणि इतर अनेक गोष्टींचा समावेश होता.




त्यानंर श्रीमती प्रा. भा. पिंपळकर, AESA समन्वयक यांनी सर्वांचे स्वागत केले आणि AESA तयार करण्यासाठी मा. विभाग प्रमुख व मा. प्राचार्य यांचे आभार मानले. त्यांनी AESA चे महत्त्व विषद करताना एखादी संघटना विद्यार्थ्यांच्या जीवनात कश्याप्रकारे कलाटणी घडवून आणण्याचे मोलाचे कार्य करु शकते या बद्दल मार्गदर्शन केले आणि AESA च्या मदतीने विद्यार्थी त्यांचे कौशल्य आणि ज्ञान कसे

विकसित करू शकतात याबद्दल माहिती दिली. त्यानंतर त्यांनी AESA अंतर्गत होणाऱ्या उपक्रमांबद्दल सांगितले. शेवटी विद्यार्थी संघटनेट निवडून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.






विभागप्रमुख, डॉ. एम. जे. पाबळे, यांनी सशक्त समाज घडवण्यासाठी संघटनेच्या महत्त्वाच्या भूमिकेवर भाषण केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आगामी कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले आणि प्रेरित केले.




डॉ. डी. आर. पानगव्हाणे यांनी NBA यशस्वी रित्या मान्यता मिळाल्याबद्दल सर्व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यानंतर भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणांबद्दल सांगितले. त्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी महाविद्यालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमांविषयी सांगितले.

**दि. १७ ऑक्टोबर,२०२२ ते दि. १८ ऑक्टोबर २०२२**

**५) शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय अवसरी (खुर्द) चा इलेक्ट्रिक टू व्हिलर डिझाईन स्पर्धेत भारतात तिसरा क्रमांक**

एस. ए. ई. इंडिया दक्षिण विभाग (SAEISS), चेन्नई यांनी आयोजित केलेल्या ‘इलेक्ट्रिक टू व्हिलर डिझाईन’ स्पर्धेत शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) चे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीम फ्यालेंक्स (Phalanx) या संघाने महाविद्यालयाचे नाव देशपातळीवर नेण्याचे काम करत या स्पर्धेत भारतात तिसरा क्रमांक पटकावला आहे. एस. आर. एम. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी, कतंकुलतुर, चेन्नई येथे दि. १७ व १८ ऑक्टोबरला स्पर्धेचे आयोजन केले गेले होते. सदर स्पर्धेसाठी श्री. कि बसोडे यांच्यासह सदर संघाला स्वयंचल विभागाचे विभागप्रमुख डॉ. एम. जे. पाबळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे यांनी टीम फ्यालेंक्स (Phalanx) ने पहिल्याच प्रयत्नात लाक्षणिक यश संपादित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.



## दि. १८ ऑक्टोबर,२०२२

### ६) महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत विद्यार्थीनी व महिलांचे हिमोग्लोबीन तपासणी

अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथे शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत (ICC Committee) दिनांक- १८-१०-२०२२, मंगळवार रोजी विद्यार्थीनी, महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी हिमोग्लोबीन तपासणी जिल्हा परिषद पुणे, आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र, अवसरी खुर्द ता.आंबेगाव, जिल्हा. पुणे यांच्या वतीने करण्यात आली. हिमोग्लोबीन तपासणी कॅम्प आयोजित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पानगव्हाणे व समिती प्रमुख डॉ. एस. एन. माढेकर, स्थापत्य विभाग यांनी मार्गदर्शन केले. आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर रणखांब, डॉ. रेश्मा बचुटे व आरोग्य विभागातील कर्मचारी सकाळी १०.३० वाजता महाविद्यालयात उपस्थित होते. ''विद्यार्थीनी व महिलांचे हिमोग्लोबीन तपासणी सकाळी ११.०० वाजता सुरु झाली. एकूण ११७ 'विद्यार्थीनी व महिलांची हिमोग्लोबीन तपासणी झाली. हिमोग्लोबीन कमी असणाऱ्या विद्यार्थीनी व महिलांना H.B. वाढवण्यासाठी गोळ्या देण्यात आल्या व आहारात काय खावे याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.



समिती उपप्रमुख श्रीमती एच.एच. राक्षे, उपयोजित विज्ञानविभाग व समिती सदस्य श्रीमती ए.व्ही. कुळकर्णी, उपकरणीकरण विभाग यांनी कॅम्प दरम्यान सर्व व्यवस्था/नियोजन केले. समिती सदस्य श्रीमती अश्विनी धि. भट, श्रीमती संध्या गुट्टे व विद्यार्थीनी अनघा थुबे यांनी कार्यक्रम पार पाडण्यास सहकार्य केले.



## दि. ३१ ऑक्टोबर,२०२२

### ७) "राष्ट्रीय एकता दिवस" (३१ ऑक्टोबर,२०२२) साजरीकरण

**१) प्रतिमा पूजन:**

दि. ३१ ऑक्टोबर,२०२२ रोजी सकाळी ठीक १०:४५ वा. लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमीत्त "राष्ट्रीय एकता दिवस" म्हणून तसेच भारताच्या माजी दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त "राष्ट्रीय संकल्प दिवस" म्हणून महाविद्यालयाचे मा. प्र. प्राचार्य डॉ. नवनाथ नेहे यांनी या नेत्यांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.



## २) राष्ट्रीय एकता दिवस शपथ:

महाविद्यालयातील सर्व अधिकारी - कर्मचारी व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या मा. प्र. प्राचार्यांनी दि. ३१ ऑक्टोबर,२०२२ रोजी सकाळी ठीक १०:५० वा. महाविद्यालयाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर एकत्रित राष्ट्रीय एकता दिवस शपथ दिली. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## 3) एकता दौड (Run for Unity):

दि. ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी ठीक ११:०० वा. लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमीत्त महाविद्यालयाचे मुख्य प्रवेशद्वार ते ग्रामपंचायत कार्यालय अवसरी (खु.) व परत महाविद्यालय या मार्गावर विद्यार्थ्यांसाठी तर महाविद्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचेकरीता महाविद्यालय प्रवेशद्वार ते स्टार कॉर्नर व परत महाविद्यालय या मार्गावर “एकता दौड” चे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर प्र. प्राचार्य यांच्या हस्ते व सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत फीत कापून सदर दौड प्रारंभ झाली. या दौडमध्ये महाविद्यालयातील ५० पेक्षाही जास्त विद्यार्थी-विद्यार्थीनिंनी व १३०-१५० अधिकारी-कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून ही दौड यशस्वी केली. सदर कार्यक्रमांचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी श्री. एम. डी. पांचाळ यांनी केले.









## दि. ०५ नोहेंबर २०२२

### ८) अणुविद्युत व दूरसंचार विभागात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

अणुविद्युत व दूरसंचार विभागात दूरसंचार विभागांत श्रीमती डॉ. किर्ती ठाकुर यांनी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'Matlab for Engineers' ह्या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि.५ नोव्हेंबर २०२२ रोजी ऑनलाईन पद्धतीने केले होते.सादर कार्यक्रम करिता डॉ. राहुल महाडिक,सिनिअर डेव्हलपर, Maths work , बंगोलोर ह्यांना एक्स्पर्ट म्हणून बोलावले होते.








## दि. ०७ नोहेंबर २०२२

### ९) संगणक विभागामध्ये "Tech-Saksham" या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यार्थिनींसाठी कार्यशाळेचे आयोजन

संगणक विभागामध्ये "Tech-Saksham" या कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यार्थिनींसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात सर्व विद्यार्थिनींसाठी AI (artificial intelligence) या क्षेत्रातील ज्ञान देण्यात आले यासाठी मुक्ता राऊत मॅडम यांनी मार्गदर्शन केले.





## दि. ०८ नोहेंबर २०२२

**१०) स्थापत्य विभाग अंतर्गत शैक्षणिक भाग म्हणून ‘COEP जिओलॉजी म्युझियम’ येथे द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी च्या विद्यार्थ्यांची यशस्वीरित्या भेट.**

शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय (खुर्द), पुणे येथे अभियांत्रिकीच्या विविध शाखांमध्ये शिक्षण दिले जात आहे. हे महाविद्यालय AICTE मान्यताप्राप्त आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असून विद्यालयातील द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकीच्या ३५ विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार , ‘COEP जिओलॉजी म्युझियम’ येथे दि. ०८ नोहेंबर २०२२ रोजी भेट देऊन जिओलॉजी या विषयाचा सविस्तर अभ्यास केला. COEP मधिल शिक्षकांचे तसेच सर्वांचे योग्य मार्गदर्शन मिळाले.







# दि. २५ नोव्हेंबर, २०२२

## ११) "नवमतदार नोंदणी महाअभियान"



शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे दि. २५ नोव्हेंबर, रोजी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत नवमतदार नोंदणी वाढविण्यासाठी व मतदार ओळखपत्राशी आधारक्रमांक जोडणीसाठी "नवमतदार नोंदणी महाअभियान"मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या निर्देशानुसार राबविण्यात आला आहे .या नवमतदार नोंदणी महाअभियान उदघाटन समारंभास तहसीलदार आंबेगाव तालुका मा. श्रीम. रमा जोशी, नायब तहसीलदार मा. डॉ. सचिन वाघ, मा. प्राचार्य डॉ. दिलीप पानगव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी मा. श्री. एम. डी. पांचाळ, इतर मान्यवर, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक व विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरनवमतदार नोंदणी " पेक्षा २५०अंतर्गत महाविद्यालयातील "महाअभियान जास्त नवमतदारांची नोंदणी करण्यात आली.












**दि. २८ नोव्हेंबर  २०२२**

**१२) स्थापत्य विभाग अंतर्गत "Study to Abroad" या विषयावर तज्ञ व्याख्यान आयोजित**

दि. २८ नोव्हेंबर  २०२२ रोजी स्थापत्य विभागामध्ये "Study to Abroad" या विषयावर श्री ऋषिकेश एस. कुलकर्णी (MS in C & M (Pursuing), Texas A & M University , Texas, USA) यांचे तज्ञ व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाद्वारे Abroad मधील विद्यापीठ मध्ये जाऊन उच्च शिक्षण कसे घ्यायचे व त्याकरिता कोणकोणत्या परीक्षा द्याव्या लागतात याबाबत सविस्तर मार्गदर्शन श्री ऋषिकेश एस. कुलकर्णी यांनी  FE /SE /TE/ BE च्या विद्यार्थ्यांना केले.








## दि. २९ नोव्हेंबर, २०२२

### १३) उपकरणीकरण व नियंत्रण विभागाची औद्योगिक सहल

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील उपकरणीकरण व नियंत्रण विभागाची औद्योगिक सहल दि. २९-११-२०२२ रोजी भिमाशंकर साखर कारखाना पारगाव येथे आयोजित करण्यात आली होती. या औद्योगिक सहलीस समन्वयक म्हणून प्रा. एस आर पाटील . प्रा. एम एम अकोले व प्रा. श्रीमती अश्विनी कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले.




## दि. ३० नोव्हेंबर, २०२२

### १४) संस्थेमार्फत तसेच स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना अंतर्गत स्थापत्य विभागातील प्ध्यापाकांचा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आयोजित

दि ३० नोव्हेंबर २०२२ रोजी स्थापत्य विभागातील प्रा. रवींद्र ठाणेदार व डॉ. सुहासिनी माढेकर यांचा संस्थेमार्फत तसेच स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना (CESA) अंतर्गत नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. प्रा. रवींद्र ठाणेदार आणि डॉ. सुहासिनी माढेकर यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. मा. प्राचार्य डॉ. डी. आर. पानगव्हाणे यांनी पुढील भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.










**दि. ०२ डिसेंबर, २०२२**

## १५) महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) येथे "आजीवन अध्ययन" या विषयावर अर्धदिवसीय परिसंवाद उत्साहात संपन्न

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे आणि शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) (अंतर्गत तक्रार समिती) यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरीता आजीवन अध्ययन या विषयावर अर्धदिवसीय परिसंवाद दि.०२-१२-२०२२, शुक्रवार रोजी मा. श्रीमती रमा जोशी, तहसीलदार ता. आंबेगाव, जि. पुणे व मा. श्रीमती मोनिका माने, सहाय्यक प्राध्यापक, यंत्र अभियांत्रिकी, डॉ. डी. वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, पुणे यांच्या प्रमुख उपस्थिती व उद्बोधनाने पार पडला.



प्राचार्य डॉ. डी. आर. पानगव्हाणे यांनी "आजीवन अध्ययनाचे आजच्या युगातील महत्व व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यक्रमांच्या नियमित आयोजनाचे महत्व विषद केले व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी सदर कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले".




मा. श्रीमती रमा जोशी यांनी आजीवन अध्ययन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, "सर्वांनी प्रत्येक विषयाचे उत्तम ज्ञान संपादन केले पाहिजे. गेलेली वेळ परत येत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळेचे योग्य नियोजन करून सदुपयोग केला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या क्षेत्रानुसार सामाजिक कार्यात मदत करून अनुभवातून शिकले पाहिजे आणि निरंतर शिकण्याची वृत्ती ठेवली पाहिजे.



या नंतर मा. श्रीमती मोनिका माने, सहाय्यक प्राध्यापक, यंत्र अभियांत्रिकी यांनी पण आजीवन अध्ययन हा विषय आपल्या पद्धतीने मांडला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक कौशल्य आत्मसात करायला सांगितले त्या म्हण्याला कि, फक्त अभ्यास नाही तर इतर हि सर्व क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रगती केली पाहिजे.



सदर अर्धदिवसीय परिसंवादाकरिता अंतर्गत तक्रार समिती प्रमुख डॉ. वंदना इनामदार व प्रा. श्रीमती एच. एच. राक्षे यांनी समन्वयक, प्रा. श्रीमती ए. व्ही. कुलकर्णी यांनी सह-समन्वयक म्हणून काम पाहिले. सदर परिसंवादाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समितीतील अधिकारी प्रा. मंगेश पांचाळ, प्रा. श्रीमती प्राजक्ता पिंपळकर, प्रा. धीरज लेंगरे, प्रा. विशाल जाधव, प्रा. श्रीमती डी. बी. माहेश्वरी, डॉ. संदीप थोरात तसेच सहाय्यक कर्मचारी श्रीमती आर. के. डवणे, श्रीमती एस. एस. जावरे, श्रीमती पी. जे. मोरे, श्रीमती ए. डी. भट, श्रीमती एस. एन. गुट्टे, श्री. पी. व्ही. दरंदले, श्री. ए. एस. राठोड, श्री. एस. डी. वणवे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## दि. ०२ डिसेंबर, २०२२

### १६) महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत “महिला पखवाडा” आयोजित

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) कायदा 2013 ची अंमलबजावणी या विषयाच्या संदर्भात, शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय अवसरी खुर्द, पुणे यांनी “२५/११/२०२२ ते १०/१२/२०२२” पर्यंत महिला पखवाडा” आयोजित करण्यात आलेला होता. अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद मार्गदर्शक तत्त्वांनुसार आम्ही “२५/११/२०२२ ते १०/१२/२०२२” या कालावधीत वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केलेले होते.

डॉ. डी. आर. पानगव्हाणे (प्राचार्य) यांच्या देखरेखीखाली शासकीय अभियांत्रिकी आणि संशोधन महाविद्यालय, अवसरी (खुर्द) यांनी ही संधी साधून चर्चासत्राचे आयोजन केले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना चांगल्या शिकण्याच्या वृत्तीच्या, महत्त्वाच्या पैलूंबद्दल जागरूक करणे हा होता. ज्यामुळे त्यांना आयुष्यभर शिकण्यास मदत होईल. परिसंवादासाठी ‘श्रीमती रमा जोशी (तहसीलदार, आंबेगाव तालुका, पुणे) आणि श्रीमती मोनिका माने (डॉ. डी.वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे)’ या दोन पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आलेले होते.

## दि. ३ डिसेंबर, २०२२

### १७) स्वयंचल अभियांत्रिकी विद्यार्थी संघटने अंतर्गत ‘Soft Skills Development’ या विषयावर तज्ञ व्यक्तींचे व्याख्यान आयोजित




स्वयंचल अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना (AESA) ने मार्फत दि. ३ डिसेंबर २०२२ रोजी 'सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट' या विषयावर “Expert Lecture” चे आयोजन करण्यात आले होते. Expert Lecture करिता श्रीमती कांचन औटी- जाधव यांना आमंत्रित करण्यात आले होते. मा. विभाग प्रमुख डॉ. एम. जे. पाबळे, AESA समन्वयक श्रीमती प्रा. भा. पिंपळकर,

सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, AESA सदस्य व १०० विद्यार्थी या Expert Lecture ला उपस्थित होते. स्वयंचल विभागाचा विद्यार्थी अंकित लांडगे याने श्रीमती कांचन औटी-जाधव यांचा परिचय करून दिला आणि विभागप्रमुख डॉ. एम. जे. पाबळे यांनी विभागातर्फे त्यांचे स्वागत केले.





विभाग प्रमुख डॉ. एम .जे. पाबळे यांनी सॉफ्टस्किल च्या मदतीने आणि खऱ्या प्रयत्नांनी कसे यश संपादन करता येते या विषयावर आपले मत व्यक्त केले. त्यानंतर श्रीमती कांचन औटी-जाधव यांनी आपल्या दैनंदिन जीवनात सॉफ्टस्किल्स आपल्याशी संबंधित असल्याने ते कसे महत्त्वाचे आहे हे सागितले. आपले दैनंदिन जीवनात सॉफ्ट स्किल्स चा योग्य रित्या वापर कसा करावा हे शिकणे किती महत्त्वाचे आहे यावर देखील त्यानी मार्गदर्शन केले. स्वयंचल अभियांत्रिकी विद्यार्थी संघटने तर्फे विभागप्रमुख डॉ. एम.जे. पाबळे, AESA समन्वयक श्रीमती प्रा. भा. पिंपळकर, सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे यांचे विशेष आभार मानले गेले.





## दि. ३ डिसेंबर, २०२२ ते १० डिसेंबर,२०२२

### १८) स्थापत्य विभागात CESA अंतर्गत विविध खेळांच्या स्पर्धा आयोजित

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालयातील स्थापत्य विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना मार्फत फुटबॉल , टेबल टेनिस , चेस कबड्डी,खो -खो अशा विविध खेळांचे आयोजन दि. ३-१२-२०२२ ते १०-१२-२०२२ या कालावधीत करण्यात आले होते. त्यात स्थापत्य विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूतपणे सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमास विभाग प्रमुख व CESA समन्व्यक डॉ एम. जे. शेख यांचे मार्गदर्शन लाभले.









## दि. १० डिसेंबर,२०२२

### १९) यंत्र विभागातर्फ औद्योगिक सहलीचे आयोजन

एस. ई. (यंत्र अभियांत्रिकी ) च्या विद्यार्थ्यांसाठी प्रोटो- डी इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड चाकण एमआयडीसी, पुणे येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी साहित्य आणि धातूशास्त्र, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या विषयाचे अनुप्रयोग समजून घेण्यास मदत करणे हा होता.

